नियमित प्र.क्र. ३५१/२०२२
सरकार वि. रामराव
नि.क्र.५०

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ शपथेवरः-</u>**

माझे नाव - बालासाहेब व्यंकटराव जाधव,
वय- ७२ वर्षे, कामधंदा - शेती,
रा. किनीनवरे, ता. औसा, जि. लातूर.

**<u>सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री एस.एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :-</u>**

फिर्यादी अमरसिंह जाधव माझा मुलगा आहे. मी आरोपी क्र.१ ते ७ यांना ओळखतो. फिर्यादी, आरोपी आणि माइयामध्ये अंदाजे दोन वर्षांपुर्वी ०६ जुन रोजी संध्याकाळी ०७.०० च्या सुमारास फिर्यादमधील नमुद घटना माइया शेतामध्ये गट नं.१९२ मध्ये घडली होती. सदर दिवशी माइया मुलगा शेतामध्ये नागंरणी करीत होता त्यावेळी आरोपी त्याठिकाणी आले आणि 'माझी वाट का नांगरतो,' असे म्हणुन मारहाण केली. आरोपींनी माइया मुलाला दगडाने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली. आरोपींनी माइया मुलाला दगडे मारायला सुरूवात केली. सदरच्या दगड माइया मुलाच्या डोक्याला लागल्यामुळे त्याला त्या ठिकाणी जखम झाली. त्यावेळी मी माइया मुलाच्या जवळच होतो. भैरवनाथ जाधव आणि सौदागर जाधव हे शेताजवळच्या वाटेवरून निघाले होते त्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर मी माइया मुलाला घेवुन पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी उपचारासाठी लामजना येथील सरकारी दवाखान्यात पाठविले. माइया मुलाच्या डोक्याची जखम गंभीर असल्यामुळे लामजना येथील डॉक्टरांनी आम्हाला लातूर येथील शासकीय रूग्णालयात पाठविले. शासकीय रूग्णालय, लातूर या ठिकाणी पाच दिवस माइया मुलावर उपचार करण्यात आले. ज्या आरोपींनी माइया मुलाला मारहाण केली त्यांना पाहील्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाहीत.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विदवान विधीज्ञ श्री. एस.टी. शिंदे मार्फत</u>** –

२. माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाले आहे.

प्रश्नः– शेतीची नांगरणी ही मे महिन्यामध्ये केली जाते.
उत्तरः– पडीक जमीन असल्यामुळे शेतीची नांगरणी जुन मध्ये करत होतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, दिवस सायंकाळी सहा वाजता मावळतो. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी सातच्या दरम्यान अंधुक अंधार असतो. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी सातच्या दरम्यान लोक शेतातील काम करून घराकडे निघालेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी शेतशेजारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझयामध्ये बांधावरून आणि रस्त्यावरून या पुर्वी वाद झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी पंचांच्या समक्ष त्यांचा जाण्या येण्याचा रस्ता नांगरू नका अशी विनंती आम्हाला केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ याने माझया मुलाला शेतामध्ये येवुन 'आमचा शेतात जाणारा रस्ता का नांगरला,' अशी विचारणा केली असता माझया मुलाने त्यांना मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ रामराव भांडणे सोडविण्यास आला असता, मी आणि माझया घरातील लोकांनी त्याला मारहाण केली, त्यामुळे रामराव यांना सहयाद्री हॉस्पीटल, लातूर येथे आठ दिवस उपचार घ्यावे लागले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील घटनेच्यावेळी आरोपी क्र.३ ते ७ घटनास्थळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याने आमच्याविरूध्द केस केलेली असल्यामुळे सदर केसला शह देण्यासाठी माझया मुलाने खोटी केस दाखल केलेली आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझया मुलाची गाडी कच्या रस्त्यावरून घसल्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा गाडीवरून पडल्याचा गैरफायदा घेवुन आरोपींविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**
**<u>फेरतपास नाही.</u>**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.07.21 15:03:06 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २१/०७/२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.07.21 15:03:10 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २१/०७/२०२६